# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/१०/२०१८
## दि.०४/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३३५/१८,भादविक ३०७,३८७,१४३,१४७,१४८,३२३,५०४,५०६,क्रिमी.ॲ.ॲक्ट क.७,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | सोहेल तोहित कुरेशी,वय-२०,रा.भिमपुरा,कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | सात ते आठ इसम (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१८ रोजी १५/३० वा.गफुर बीफ शॉप,गल्ली नं.१,पाटील इस्टेट वसाहत, शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे चुलते यांचेमध्ये गफुर बीफ नावाचे दुकान असुन,त्यांचे दुकानात कामगार अयुब फकीर अहमद कुरेशी,वय-३८,रा.आर.के.चौक,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे हा हजर असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे चुलत्यांनी ५ हजार रूची खंडणी म्हणुन देण्यास तसेच सदरची जागा सोडण्यास नकार दिल्याचे कारणावरून कोयता, सिमेंटचा ब्लॉक,जाड प्लॅस्टिकचे पाईप व लाकडी दांडक्याने फिर्यादी व अयुब कुरेशी यांचे डोक्यात व इतर ठिकाणी घातक वार करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करून,आसपासचे परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.एस.देवकर ९५९४९८४२९१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५१४/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | नवीन पवार,वय-३०,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०१८ रोजी पहाटे ०१/०० सकाळी १०/०० वा.चे दरम्यान फॅलट नं.१०१,योगा अमृत सोसायटी,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,हॉल मधील एलईडी २० हजार रू किचा व कपाटातील रोख ५२ हजार रूपये व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण १,५२,५००/- रु किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.आर.चिवडशेट्टी ८१०८२२२०६८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २१२/१८,भादविक ४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | विकास इंगळहळीकर,वय-७१ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१८ रोजी पहाटे ०२/३० वा. ते ०३/३० वा.चे दरम्यान गंगालहरी सोसायटी, फ्लॅट नं.ए/८, बी/२३, ए/१ व बी/१८,१९ या फ्लॅट मध्ये कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची भाची मिरा भाटवडेकर,रा.फ्लॅट नं.ए/८,गंगालहरी सोसायटी,कर्वेनगर, पुणे हिचा फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने तीचे घराचा कडी कोयंडा कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत घरात प्रवेश करुन घरफोडी केली आहे. परंतु सदर घरफोडी मध्ये काय गेले हे स्पष्ट होवु शकले नाही. त्याचप्रकारे सदर सोसायटी मध्ये राहणारे रहिवासी १)रविंद्र नाटेकर,वय-६७ वर्षे,रा.फ्लॅट नं.३५,सी विंग, गंगालहरी सोसायटी,कर्वेननगर,पुणे २)अजित बोरगे,वय-४२ वर्षे,रा.फ्लॅट नं.१८,१९,गंगालहरी सोसायटी ३)मिलींद चौबळ,वय-५८ वर्षे,रा.बी-२३,गंगालहरी सोसायटी यांचे फ्लॅट मध्ये देखील घरफोडी चोरीचा प्रयत्न झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.शिनगारे ९५२७९५६१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २१४/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | सौ.संगिता बोरकर,वय-४० वर्षे,रा.डहाणुकर कॉलनी,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१८ रोजी १०/०० वा. ते १७/४५ वा.चे दरम्यान फ्लॅट नं.५,अमेय अपार्टमेंट,लेन नं.०४,डहाणुकर कॉलनी,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने असा एकुण ०६,०७,५००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.देशमुख ८६६८५५६१०० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३३१/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | नानासाहेब गंगावणे, पो.शि. खडकी पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | टॅंकर क्र.एम.एच./१२./एल.टी./६५३१ हिचेवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०९/२०१८ रोजी १४/३० वा. संगमवाडी ब्रीज,शिवाजीनगरकडे जाण-या रोडवर, शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक पादचारी अनोळखी इसम, वय-अंदाजे ४५ वर्षे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (सदर अनोळखी इसमास उपचारकामी ससुन हॉस्पीटल,पुणे येथे ॲडमीट केले असता,तो दि.०३/१०/२०१८ रोजी १५/३० वा.उपचारादरम्यान मयत झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. व्ही.एस.आजगेकर ७७७४०३२४४६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३६९/१८,भादविक १४३,१४७,४२७,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | अमृत परदेशी,वय-३३,रा.ओटा नं.१७,शिवदर्शन पर्वती,पुणे |
| **आरोपी** | १.उमेश अशोक माचुत्रे,वय-२८,रा.शिवदर्शन,पुणे २.योगेश अशोक माचुत्रे,वय-३२,रा.सदर ३.अशिष चंद्रकांत कांबळे,वय-३६,रा.सदर ४.साईप्रसाद शामराव बोडखे,वय-३४,रा.आंबेगांव-बुद्रुक,पुणे ५.सलीम महामुद्दीन शेख,वय-४३,रा.शिवदर्शन,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०१८ रोजी २१/३० ते २२/०० वा.मुक्तांगन हायस्कुल अमृततुल्य चहाचे दुकाना जवळील गेट समोर शिवदर्शन पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दुकाना समोर यातील नमुद इसम व गणेश यांचेमध्ये गाडीचा हॉर्न वाजविल्याचे कारणावरुन वाद झाला होता. त्या कारणावरून चिडुन जावुन सदर इसमांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी यांचे दुकाना पुढील खुर्च्यांची तोडफोड करुन दुकानातील कामगारांना शिवीगाळ करून,गणेश यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. आर.पी.कुलथे ८९७५७५८५७७ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३७०/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२४,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | उमेश माचुत्रे,वय-२८,रा.शिवदर्शन,पुणे |
| **आरोपी** | १.गणेश दत्तात्रय वैद्य,वय-३३,रा.शिवदर्शन,पुणे २.अक्षय माणिक दुसंगे,वय-२७,रा.शिवदर्शन, पुणे ३.सागर विश्वास खोत,वय-२६,संजीवनी सोसा.पुणे ४.हेमंत किसन वैद्य,वय-३०,रा. शिव दर्शन,पुणे ५.गौरव विजय जाधव,वय-२१,रा.५६९,पद्मावती,पुणे ६.मंदार मुकुंद झंजाड,वय-२३,पर्वती दर्शन,पुणे (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०१८ रोजी २१/४० वा.मुक्तांगण शाळेच्या गेट समोर शिवदर्शन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वॉकींग करीत असताना,फिर्यादी यांचे भाऊ संतोष माचुत्रे यांस यातील नमुद इसमांनी मुक्तांगन शाळेच्या गेट समोर गाडीचा हॉर्न का वाजवला या कारणावरुन लाथा-बुक्यांनी व हातातील फायटरने डोक्यास,कपाळावर,ओठावरती व भुवई वरती मारुन त्यांना जखमी व शिवीगाळ करुन,जीवे ठार मारण्याजी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.डी.जाधव ९८८१५७२६०३ |
| **८** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २०६/१८,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,रा.कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै-२०१८ ते दि.१० ऑगस्ट २०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे मुलगा व मुलीस कॅम्प,पुणे येथील नामांकीत कॉन्व्हंट स्कुल येथे २०१८-२०१९ या वर्षाकरीता प्रवेश घेण्याकरीता फॉर्म भरला असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे कडील मोबाईल नंबरवरुन जुलै-२०१८ ते ऑगस्ट-२०१८ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे फोनवर संपर्क करुन,दोन्ही शाळेत प्रवेश करुन देण्याचे आश्वासन देऊन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यांना वेळोवेळी एकुण १,४०,०००/- रुपये सदर इसमांचे खात्या मध्ये भरण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी पैसे भरल्यानंतर मुलांचे प्रवेशा बाबत फोन केले असता त्यांनी फोन उचलने बंद करून,फिर्यादी यांचे मुलाचे प्रवेश न करता त्यांचे पैसे परत न करता,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.बी.कुलाळ ९०११०५२६४० |
| **९** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४७८/१८,भादविक ३५३,५०६ |
| **फिर्यादी** | एक म.पो.शि. दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | सोहेल शौकत शेख,वय-१९,रा.वडगांव-बुद्रुक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०१८ रोजी १९/३० वा. वडगांव पुला जवळ,सिंहगड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी यांचेसह नमुद ठिकाणी वाहतुक नियमन व दोषी वाहनांवर कारवाई करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,बुलेट मोटार सायकलवरून विरूध्द दिशेने येणारा यातील नमुद इसम सोहेल शेख यास फिर्यादी यांनी हाताने ईशारा करून थांबविण्याचा प्रयत्न केला असता,बुलेटचे मागे बसलेला इसम सोहेल शेख याने फिर्यादीस माझे वडील पुणे शहरात पोलीस आहेत,तसेच माझ्या गाडीस पोलीसांचा सिम्बॉल लावलेला आहे असे म्हणुन फिर्यादी व सहकारी यांचेशी वाद घालुन,आरडा-ओरडा करून,माझे वडील पोलीस आहेत,मला सर्व कायदा माहित आहे,तुम्ही पावत्या कशा करता हे मला माहित आहे असे बोलुन,वाहतुक शाखेचे वरिष्ठ अधिकारी यांचेशी वाद घालुन,तुम्ही केस करा,मी बघुन घेतो असे बोलुन,फिर्यादी व सहकारी यांचेशी उध्दट वर्तन करून,त्यांचे हातातील सरकारी ई-चलन पावती मशीन हिसकावुन घेवुन फेकुन देवुन,फिर्यादी व सहकारी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहिते ८८०५१०९२०० |
| **१०** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४६९/१८,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | शंकुतला कृष्णा पवार,वय-४७ वर्षे,रा.जनवाडी,पुणे |
| **आरोपी** | अविनाश अशोक मोरे,वय-२९,रा.१०१, जनवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.चे पुर्वी हडपसर ते लोणी रेल्वे स्टेशन रनिंग कि.मी. नं.१९९/2 मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा महेश कृष्णा पवार,वय-२५ याचे व नमुद इसम अविनाश मोरे यांचे मध्ये मटक्याचे पैशाचे कारणांवरुन झालेल्या वादामुळे अविनाश याने महेश याचे गळयावर ब्लेडने वार केले होते. त्यानंतर महेश तेथुन पळुन गेल्यानंतर अविनाश याने महेश यास तु माझे पैसे दे असे म्हणुन त्याचेकडे वेळोवेळी वारंवार पैशाची मागणी करुन,नाहीतर तुझी पोलीसांत तक्रार करतो असे म्हणुन त्यास धमकी देवुन,महेश यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. (सदरचा गुन्हा हा ०० नंबरने पुणे लोहमार्ग पो स्टे यांचेकडुन प्राप्त झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आर.शिंदे ९७६४५१६५५० |

## <u>दि.०५/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १९२/१८,भादविक ३५३,३२३,३४ व मुंबई दारूबंदी अधि.८५ |
| **फिर्यादी** | तुकाराम रायकर, पो.ना. डेक्कन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.निलेश भास्कर ताजणे,वय-२९,रा.शिवाची वाडी,मोशी,पुणे २.पुष्कर प्रभाकर मंडलीक, रा. मेहुनपुरा,शनिवार पेठ,पुणे ३.पियुष दिलीप दुगड,वय-३२,रा.ता.शिरूर,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१८ रोजी २०/०० ते २०/१५ वा.नदि पात्र रोड डेक्कन तसेच डेक्कन पो स्टे येथे घेवुन येत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी पो.शि. शरद डामसे यांचेसह बालगंधर्व मार्शलला असुन,ते त्यांचे सरकारी वाहनासह गस्त घालीत असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद इसम हे त्यांची गाडी अंधारात घेवुन थांबल्यामुळे फिर्यादी यांना संशय आल्याने फिर्यादी यांनी त्यांना हटकल्याचे कारणावरून,तसेच त्यांना डेक्कन पो स्टे येथे घेवुन जात असताना,सदर इसमांनी फिर्यादी यांचेबरोबर झटापटी करून,ते सरकारी कर्तव्य बजावु नये म्हणुन त्यांचे सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.सोनवणे ८७८८७३८०७३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १६८/१८,भादविक ३५३ |
| **फिर्यादी** | बाबासाहेब गोरवे, पो.शि. मार्केटयार्ड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | रोहित रविकांत बनजगोळे,वय-२२,रा.सावरकर चौक,धनकवडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१८ रोजी २२/४५ वा. मार्केटयार्ड गेट नं.१ शेजारील पार्कींग परिसर शिवनेरी रोड मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मार्केटयार्ड पो स्टे चे बीट मार्शल असुन,यातील नमुद इसम रोहित बनजगोळे हे सदर ठिकाणी आपसात भांडत असताना,फिर्यादी हे त्यांना समजावुन सांगत असताना,सदर इसमाने तु आम्हाला विचारणारा कोण असे फिर्यादीस म्हणुन त्यांना अपशब्द वापरून, त्यांचेबरोबर झटापटी करून,त्यांचे सरकारी गणवेश ओढुन,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एम.भोसले ९१३९७७७१११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**